
# Leprosy:Myths And Facts

By Pune Chapter Of IADVL
Maharashtra State Branch




## Leprosy Is Curable

Contact Your Dermatologist

# Leprosy Patient Information

1. **What is the cause of leprosy ?**
   Like many other diseases it is also caused by a bacteria, Mycobacterium leprae.

2. **How does a person know that he / she has leprosy?**
   Any patch that is long standing, non itchy ,light or red in colour ,with loss of sensation ,loss of hair on the patch and absence of sweating over the patch should raise the suspicion of leprosy. Some patients notice swelling over hands and feet ,face and ear pinna. There may be loss of eyebrows and tingling and numbness on hands and feet with or without loss of sensations.

3. **Is it contagious?**
   It is believed to spread through droplets from the nose or mouth of an infected person. It can also spread by skin to skin contact. There needs to be frequent and prolonged contact with an infected untreated person to contract the disease. Majority of patients are non infectious, only advanced cases are infectious.

4. **Should the person with leprosy be isolated in a separate room?**
   No it is not required. He can do all the routine activities like any other member of the family.

5. **Should he use separate utensils and wash clothes separately?**
   No this is not necessary?

6. **Is it curable?**
   Leprosy is completely curable if you take proper course of the medicines advised by your doctor.

7. **Where can I do the tests and get the medicines?**
   All government medical hospitals, primary health centres and private skin specialists can perform the necessary tests to confirm the diagnosis. Medicines are cheap and easily available

8. **What precautions should I take ?**
   Taking care of hands and feet is extremely important. If there is numbness then you may get injuries or burns.Daily inspection for any wound or burn mark, soaking in warm water and application of oil, special footwear ,not to work bare foot would help to prevent damage. Ladies should avoid holding hot objects with hand .

9. **Do the fingers and toes fall off if some one gets leprosy?**
No. Not if you take care of your hands and feet along with the medicines prescribed by your doctor. You must not stop the medicines till your doctor tells you to do so.

10. **If my hands and feet are weak what can I do to improve the grip?**
You can use a soft ball to press, use of rolling pin, tyre tube are some of the physiotherapy exercises that can be performed at home. In addition if possible you can take help of a physiotherapist.

11. **What precautions should I take for my family members?**
You should get them checked for any signs and symptoms of leprosy?

12. **Can a person infected with leprosy get married?**
Yes. A person with leprosy can lead a normal married life and have children.

13. **What if a person with leprosy gets pregnant or gets leprosy after becoming pregnant?**
Most women with leprosy have normal pregnancy and deliver healthy babies and the treatment of Leprosy should be continued all throughout pregnancy by consulting your doctor.

14. **Can a child develop leprosy from an infected mother?**
No if the mother is on treatment.

15. **Can the mother having leprosy breast feed the child?**
Yes.

16. **How long the treatment is necessary?**
The duration of therapy varies according to the type. It can be averagely from 6 months to 2 years. It may vary from person to person. You must continue till your doctors tells you that you are cured from the disease

17. **Do I need to visit my doctor after getting cured?**
Yes you should visit the doctor even after getting cured .

18. **Will I be denied job if I have leprosy?**
\- No

19. **Do all patients develop deformity ? Is it due to past sins ?**
Early Diagnosis and appropriate treatment can prevent deformity. Leprosy is not due to past sins.

१. **कुष्ठरोग हा आजार कशामुळे होतो ?**

हा आजार M. Leprae नावाच्या जीवाणूंमुळे होतो.

२. **या आजाराची नेमकी लक्षणे कोणती असतात ?**

१. दीर्घ मुदतीचा बधीर चट्टा, ज्याला खाज येत नाही.
२. **फिक्कट पांढुरके** अथवा लाल रंगाचे चकाकणारे चट्टे.
३. हातापायाला मुंग्या अथवा सूज येणे.
४. हात, पावले बधीर होणे, चप्पल पायातून निसटणे.
५. भुवयांचे केस **कडेने विरळ होणे,** चेहरा सुजणे, कानाला सूज येणे.
६. चट्टयावरील केस **कमी अथवा नाहीसे** होणे किंवा शुष्क होणे.

३. **हा आजार संसगर्जन्य आहे का ?**

नाकावाटे अथवा रुग्णाच्या थुंकी मधून हे जंतू बाहेर पडतात व इतरांना लागण होऊ शकते. ज्या व्यक्तींना जास्त तीव्र आजार होतो व ज्यांच्या त्वचेमध्येही जंतू आढळतात अशा व्यक्तींच्या संपर्कात दीर्घकाळ राहिल्यास व खूप जवळून संपर्क आल्यास हा आजार होऊ शकतो. बहुतांश रुग्णांना संसर्ग होत नाही. तीव्र आजार असलेल्या रुग्णांन पासुन संसर्ग होण्याची शक्यता असते.

४. **कुष्ठरोग झालेल्या व्यक्तींना घरात वेगळ्या खोलीत ठेवावे लागते का ?**

नाही. घरातील इतरांबरोबर राहून सर्व व्यवहार करायला काही हरकत नसते.

५. **या व्यक्तींची भांडी व कपडे वेगळे धुवावेत का ?**

नाही.

६. **हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो का ?**

हा आजार पूर्ण बरा होतो. वैद्यकीय सल्ल्याने योग्य ते उपचार घेतल्याने रुग्ण पूर्ण बरा होऊ शकतो.

७. **कुष्ठरोगाची लक्षणे आढळ्यास तपासणीसाठी कोठे जावे ?**

सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व त्वचारोग तज्ज्ञ योग्य त्या तपासण्या करून या आजाराचे निदान करू शकतात. औषध स्वस्त आणि सहजासहजी उपलब्ध असतात

### ८. यासाठी लागणारी औषधे कोठे मिळतात ?

सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे या ठिकाणीही औषधे मोफत मिळतात. औषधांच्या दुकानात डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शन असल्यास औषधे विकत घेता येतात. या दोन्ही ठिकाणी मिळणाऱ्या औषधांचा दर्जा उत्तम असतो.

### ९. निदान झालेल्या रुग्णांनी काय काळजी घ्यावी?

या आजारात त्वचेच्या संवेदना कमी झाल्यामुळे इजा होण्याच्या संभव असतो. तसेच गरम पदार्थ किंवा वस्तूंमुळे भाजण्याचा धोका असतो. रोज काम संपल्यावर हात व पाय स्वच्छ पाण्याने धुवून निरीक्षण करावे व खोबरेल तेलाचा हात फिरवावा. कुठे जखम नाही ना याची खात्री करावी. जखम दिसल्यास दुर्लक्ष करू नये, तज्ज्ञांच्या सल्ल्याने लगेच उपचार करावेत. स्वयंपाकघरात काम करताना गरम वस्तू सांडशीने उचलाव्यात. गरम पेये पिताना शक्यतो कानाचे कप/ ग्लास वापरावेत. विशिष्ट प्रकारची मऊ पादत्राणे वापरावीत व अनवाणी चालू नये.

एखादा सांधा किंवा स्नायू दुखावला असेल तर शेकू नये तेलाने हलके मालिश करायला हरकत नाही.

### १०. कुष्ठरोगामुळे हातापायाची बोटे झडण्याचा धोका अजूनही आहे का ?

जर आपण योग्य वेळी उपचार सुरु केले व डॉ. नी सांगितल्यानुसार औषधे घेतली, हातापायांची नीट काळजी घेतली तर हा धोका संभवत नाही. अलीकडे आधुनिक उपचार पद्धती मुळे हे प्रमाण अतिशय कमी झाले आहे. डॉक्टरांनी सांगेपर्यंत उपचार बंद करू नयेत.

### ११. हातापायाची ताकद कमी झाली तर काय करावे ?

यासाठी फिजिओथेरपीचा उपयोग होऊ शकतो. घरच्याघरी करण्याजोगे व्यायामही उपयुक्त ठरतात. रबरी बॉल हाताने दाबावे, हाताच्या पंजाने लाकडी टेबलावर वर्तमानपत्राचा चुरगळा करावा, लाटणे घेऊन लाटण्याची Action करावी, टायरच्या ट्यूबने पायाचे व्यायाम करावे. हे व्यायाम रोज दोन वेळा तरी अवश्य करावेत.

### १२. माझ्या घरातील इतर लोकांच्या सुरक्षेसाठी काय काळजी घ्यावी ?

घरातील सर्व व्यक्तींची, त्वचारोग तज्ज्ञांकडून तपासणी करून घ्यावी, याशिवाय त्वचेवर कुठे चट्टा उदभवत नाही ना ह्यावर घरच्या लोकांनी सतत लक्ष ठेवणे व जागरूक राहणे आवश्यक आहे.

**१३. कुष्ठरोग झालेल्या रुग्णाने लग्न करावे का ?**

हो! या व्यक्ती इतरांप्रमाणेच नॉर्मल नैसर्गिक वैवाहिक जीवन जगू शकतात तसेच त्यांना मुले होण्यासही कोणतीही अडचण येत नाही.

**१४. गरोदर असताना किंवा बाळंतपणात कुष्ठरोगाचे निदान झाल्यास औषधे बंद करावी लागतात का ?**

नाही, आपल्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली औषधे नियमितपणे चालू ठेवावीत. बाळावर या औषधांचा कोणताही दुष्परिणाम होत नाही.

**१५. बाळाला आईपासून कुष्ठरोग होण्याची शक्यता असते का ?**

नाही! आई जर नियमित औषधे घेत असेल तर बाळाला आजाराची लागण सहसा होत नाही.

**१६. कुष्ठरोगी आई बाळाला पाजू शकते का ?**

हो! स्तनपान थांबवण्याची काहीच गरज नसते.

**१७. या आजाराची औषधे कायम स्वरूपी घ्यावी लागतात का ?**

नाही! आजाराच्या तीव्रतेनुसार आणि औषधां च्या प्रतिसादानुसार उपचारांचा कालावधी ठरतो. सर्वसाधारणपणे ६ महिने ते २ वर्षापर्यंत उपचार सुरु ठेवावे लागतात.
डॉक्टरांनी सांगितल्यावरच उपचार थांबवावेत.

**१८. आजार पूर्ण बरा झाल्यावर परत तपासणी आवश्यक असते का ?**

हो! नंतर वर्षातून २ वेळा आपल्याला तपासणी करन घेणे आवश्यक असते. जर एखाद्या रुग्णाचा आजार उलटलाच, तर लवकर लक्षात येते व वेळीच उपचार करता येतात.

**१९. कुष्ठरोगी व्यक्तीला कामावरून काढले जाते का ?**

नाही! कायद्याने असे करता येत नाही.

**२०. कुष्ठरोग पूर्वजन्मी केलेल्या वाईट कृत्याचे फळ असते का ? या आजारात हात पाय किंवा इतर अवयव अधू होतात का ?**

नाही . योग्य औषधोपचार केल्यास अशी गुंतागुंत टाळता येते.

# PUNE CHAPTER OF IADVL
# MAHARASHTRA STATE BRANCH

## Activity In public interest for increasing awareness and clearing myths about Leprosy

**Dr. Dhanashree S. Bhide**
President

**Dr. Pradyumna Vaidya**
Vice President

**Dr. Rohini Gaikwad**
Vice President

**Dr. Niteen Dhepe**
Vice President

**Dr. Rashmi Soni**
Secretary

**Dr. Amit Kelkar**
Treasurer

**Dr. Ritu Choubey**
Joint Secretary

**Dr. Poorva Shah**
Joint Secretary

Leprosy is Curable